| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ९७ वा | शनिवार, दिनांक ०४ जुलै २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# मोदी सरकारचा मोठा निर्णय! लष्कर-ए-तैयबा, जैशशी संबंधित २३ संशयित दहशतवादी ‘आतंकवादी’ घोषित

**नवी दिल्ली/वृत्तसेवा:** देशविरोधी कारवायांवर आणखी कठोर भूमिका घेत केंद्र सरकारने मोठी कारवाई केली आहे. बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्या (UAPA) अंतर्गत २३ संशयित व्यक्तींना अधिकृतपणे ’दहशतवादी’ घोषित करण्यात आले आहे. हे सर्वजण पाकिस्तानस्थित लष्कर-ए-तैयबा (LeT), जैश-ए-मोहम्मद (JeM) आणि इतर दहशतवादी संघटनांशी संबंधित असल्याचा आरोप आहे. गृह मंत्रालयाने याबाबत राजपत्र अधिसूचना जारी केली असून, या सर्वांची नावे UAPA च्या चौथ्या अनुसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. सरकारच्या माहितीनुसार, या व्यक्ती जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी कारवाया घडवून आणणे, तरुणांची भरती करणे, शस्त्रांची तस्करी करणे आणि दहशतवादी कारवायांना आर्थिक मदत पुरवणे अशा कामांमध्ये सक्रिय होते. सध्या यातील बहुतांश जण पाकिस्तान किंवा पाकिस्तानव्याप्त काश्मीर (PoK) मध्ये वास्तव्यास असल्याचे सांगण्यात आले आहे.




या यादीत मसूद इलियास कश्मीरी, मोहम्मद मुसादिक, मुफ्ती मोहम्मद असगर खान, हाफिज अब्दुल शकूर, अब्दुल रऊफ, हाफिज खालिद, मौलाना सैफुल्लाह खालिद, मोहम्मद याकूब, मौलाना युसूफ तैयबी, ओवैस फारूज, राणा इफ्तिखार, वसीम नूर जाट, मोहम्मद शहीद फैसल यांच्यासह एकूण २३ जणांचा समावेश आहे.

**नगरोटा आणि सुंजवान हल्ल्यांशी संबंध असल्याचा दावा**

गृह मंत्रालयाच्या माहितीनुसार, यादीतील काही संशयितांचा २०१६ मधील नगरोटा लष्करी तळावरील दहशतवादी हल्ला आणि २०२२ मधील जम्मूच्या सुंजवान भागातील सुरक्षा दलांवरील हल्ल्याशी संबंध असल्याचा दावा करण्यात आला आहे.

**लष्कर प्रमुख हाफिज सईदचे निकटवर्तीयही यादीत**

सरकारने जारी केलेल्या यादीत अब्दुल रऊफ आणि हाफिज खालिद वलीद यांची नावेही आहेत. हे दोघे लष्कर-ए-तैयबाचा प्रमुख हाफिज मोहम्मद सईद यांचे निकटचे सहकारी असल्याचा आरोप गृह मंत्रालयाने केला आहे.

**बंगळुरूचा पत्ता, पण सध्या पाकिस्तानात वास्तव**

या यादीतील मोहम्मद शहीद फैसल उर्फ उस्ताद उर्फ जाकिर याचे कायमचे वास्तव्य बंगळुरू (कर्नाटक) येथे असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, सध्या तो पाकिस्तानातील रावळपिंडी येथे राहत असल्याची माहिती सरकारने दिली आहे.

गृह मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, त्याचे संबंध लष्कर-ए-तैयबा, अल-कायदा आणि ISIS शी संबंधित मॉड्यूलशी आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणांना दहशतवादी संघटनांमध्ये भरती करणे, त्यांना शस्त्रांचे प्रशिक्षण मिळवून देणे आणि दहशतवादी कारवायांसाठी निधी उभारणे, असे गंभीर आरोप त्याच्यावर आहेत.

**UAPA अंतर्गत पुढील कारवाईचा मार्ग मोकळा**

गृह मंत्रालयाने स्पष्ट केले की, उपलब्ध पुरावे आणि गुप्तचर माहितीच्या आधारे या व्यक्ती दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे UAPA च्या कलम ३५ अंतर्गत त्यांना अधिकृतपणे दहशतवादी घोषित करण्यात आले आहे.

या निर्णयामुळे संबंधित व्यक्तींविरोधात UAPA अंतर्गत पुढील कायदेशीर कारवाई अधिक सुलभ होणार असून, दहशतवादाविरोधातील कारवाईला आणखी बळ मिळणार असल्याचे केंद्र सरकारने म्हटले आहे.

## निकृष्ट रस्ता कामामुळे दीड तास रास्ता रोको

**रेणापूर/प्रतिनिधी:** तालुक्यातील घनसरगाव फाटा ते घनसरगाव दरम्यानच्या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप करीत ग्रामस्थांनी घनसरगाव फाट्याजवळ शुक्रवारी सकाळी दीड तास रास्ता रोको आंदोलन केले. त्यामुळे वाहतूक विस्कळीत झाली होती. प्रशासनाने दखल न घेतल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

घनसरगाव ते घनसरगाव फाटा हे तीन किलोमीटरचे अंतर आहे. गेल्या अनेक वर्षापासून या रस्त्याची दुरवस्था झाली होती. ग्रामस्थांच्या पाठपुराव्यानंतर नुकतेच जिल्हा परिषदेंतर्गत या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली. मात्र, हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले जात आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस असून, थोडासा जरी पाऊस झाला तर संपूर्ण रस्त्यावर चिखल निर्माण होतो. चिखलामुळे दुचाकी घसरून शेतकरी, नागरिक आणि विद्यार्थी पडून जखमी होत आहेत. वर्षानुवर्षे रखडलेला रस्ता तात्काळ व्हावा, ही आमची मागणी आहे. पण, तो दर्जेदार आणि नियमानुसारच झाला पाहिजे, अशी आक्रमक भूमिका ग्रामस्थांनी घेतली. यावेळी नागरिक उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**लातूर, (जिमाका) :** कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत ४ जुलै, २०२६ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते १८ जुलै, २०२६ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

### प्रभात किरणे

समोर एक माघरी एक
असू नये वागण,बोलण
असत्य करीती सर्वनास
सत्य चिरंजीवी,न मरण

-इंजि. नागनाथ कलवले

लातूर ९७६४७ ८८२८८

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



शाळेच्या ५०० मीटर परिसरात स्टिंग एनर्जी ड्रिंक विक्रीस बंदी..

### चिमटा दयाचा

लातूर शहरातील समस्या अनेक आहेत!
त्या सोडविताना दमछाक होणार आहे!!
मवाळ धोरणापेक्षा कडक धोरणाची गरज आहे!!!

## MHT-CET गुणवंतांचा बाभळगावात गौरव; स्वतंत्र CET मार्गदर्शन केंद्र सुरु करण्याचा मानस

**बाभळगाव/प्रतिनिधी :** कै. व्यंकटराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय, बाभळगाव येथे चक्ढ-उएढ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. ज्ञानदेव कांबळे यांची उपस्थिती होती.

प्रा. ज्ञानदेव कांबळे यांनी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, करिअरच्या विविध संधी आणि योग्य शाखा निवडीबाबत मार्गदर्शन करताना, यश हा प्रवासाचा प्रारंभ असून बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात सातत्याने ज्ञान, कौशल्य आणि नावीन्य आत्मसात करणे आवश्यक आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्त आणि कठोर परिश्रम यांच्या बळावरच उज्ज्वल भविष्य घडते, असे प्रतिपादन केले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी महाविद्यालयात स्वतंत्र उएढ मार्गदर्शन केंद्र सुरू करण्याचा मानस व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी अभ्यासासाठी स्टडी ग्रुप स्थापन करून नियमित सराव करावा तसेच ग्रंथालयातील उएढ व स्पर्धा परीक्षांसाठी उपलब्ध संदर्भग्रंथांचा प्रभावी उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महाविद्यालय सदैव त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. प्रास्ताविकात प्रा. विवेक कदम यांनी उएढ परीक्षेचे महत्त्व आणि महाविद्यालयाच्या मार्गदर्शन उपक्रमांची माहिती दिली. यावेळी उएढ मध्ये उल्लेखनीय यश मिळविलेल्या राजवर्धन पाटील, अंकिता चव्हाण, श्रद्धा काळे, स्नेहा कुटवाडे, मंथन नागिमे, वैभव वडूर्ले, सानिया शेख, खंदाडे, सय्यद, दोरवे, शिंदे आणि साक्षी खरटमोल या विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांचा पुष्पहार, सन्मानचिन्ह व रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमास उएढ सेल प्रमुख प्रा. बालिका गौंड तसेच प्रा. नंदा खरटमल, प्रा. अंकिता वाडकर, प्रा. सोपान डोपे प्रा. हरिहर गायके यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रा. संतोष कल्याणकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. शिल्पा हालसीकर यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उदगीरात विवाहितेचा मृत्यू; तपासाची मागणी

**उदगीर/प्रतिनिधी:** शहरातील देगलूर रोड परिसरात राहणाऱ्या एका ३२ वर्षीय विवाहितेचा शुक्रवारी दुपारी जळाल्याने मृत्यू झाल्याची घटना समोर आली. या घटनेनंतर मृत महिलेच्या नातेवाईकांनी हा मृत्यू नैसर्गिक अथवा अपघाती नसल्याचा आरोप केला आहे.

या प्रकरणात संशयिताविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक करावी, अशी मागणी करण्यात आली. यासाठी रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास नातेवाईक, नागरिक मोठ्या संख्येने उदगीर ग्रामीण ठाण्यासमोर जमले होते. संशयितावर खुनाचा गुन्हा दाखल केल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचा पवित्रा नातेवाईकांनी घेतला. याचा सखोल तपास करावा.अशी मागणीही नातेवाई यांनी केली.

## सराईत चोरटा जेरबंद, तीन गुन्ह्यांची उकल; ५२ हजार ९९९ रुपयांचा मुद्देमाल जप्त

**लातूर/प्रतिनिधी:** पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या आदेशानुसार व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने सराईत चोरट्याला जेरबंद करत तीन गुन्ह्यांची उकल केली आहे. आरोपीकडून चोरीतील रोख रक्कम व विविध कंपन्यांचे मोबाईल फोन असा एकूण ५२ हजार ९९९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या बाबत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, दि. ३ जुलै २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक लातूर शहरात मालमत्तेविरुद्धचे गुन्हे करणाऱ्या आरोपींचा शोध घेत असताना माहिती मिळाली की, नवीन रेणापूर नाका ते रेल्वे स्टेशन मार्गावर एक संशयित इसम चोरीचे मोबाईल घेऊन उभा असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. माहितीच्या आधारे पथकाने तात्काळ सापळा रचून संबंधित इसमाला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपले नाव दिनेश माधव टेकाळे ऊर्फ शंकर दत्तात्रय पाचाळ (वय ३४, रा. हरिभाऊ नगर, कृपासदन रोड, लातूर) असे सांगितले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडून रोख ७ हजार रुपये व तीन मोबाईल फोन मिळून आले. विश्वासात घेऊन चौकशी केली असता आरोपीने लातूर शहरातील दोन मेडिकल दुकानांमध्ये चोरी केल्याची तसेच गर्दीच्या ठिकाणाहून मोबाईल फोन चोरल्याची कबुली दिली.

सदरील व्यक्तीकडून विवो, सॅमसंग आदी कंपन्यांचे मोबाईल फोन तसेच चोरीतील रोख रक्कम जप्त करण्यात आली. या कारवाईत पोलीस ठाणे शिवाजीनगर येथील गुन्हा क्र. ११/२०२६, ३०/२०२६ व ३१५/२०२६ या तीन गुन्ह्यांची उकल झाली. गुन्हेगाराकडून रोख रक्कम व मोबाईल असा एकूण ५२,९९९ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून पुढील तपासात आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

ही कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सर्जेराव जगताप, पोलीस अंमलदार युवराज गिरी, मोहन सुरवसे, राजेश कंचे, जमीर शेख, राहुल कांबळे , प्रदीप स्वामी, सीद्धेश्वर मदने, काकासाहेब बोचरे, शैलेश सुडे, रामदास बाचीफळे यांनी पार पाडली.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## महत्वाच्या प्रश्नाल बगल नको...

राज्यात काय चालले आहे हेच भ्रमित करणारा प्रश्न आहे. राज्यात अनेक प्रश्न आहेत. सुदैवाने मान्सुन सक्रिय झाला आहे. नसता राज्यात भीषण पाणी टंचाईचा प्रश्न निर्माण झाला असता. अजून काही भागात म्हणावा तसा पाऊस नाही त्यामुळे पेरण्या खोळंबल्या आहेत. पावसाची गरज आहे. काही ठिकाणी दमदार पाऊस होत आहे ही सर्वात समाधानाची बाब आहे. आता राज्यात अनेक प्रश्नाची सोडवणुक होणे अपेक्षित आहे. त्यात मुंबईत राज्याचे पावसाळी अधिवेशन चालू आहे. या अधिवेशनात जतनेसाठी काही पदरात पडेल असे वाटत असताना यात गोंधळ होत आहे. कामकाज सुरळीत चालत नाही. ही एक चिंतेची बाब आहे. हेच अधिवेशन काय कोणतेही अधिवेशन म्हटले की, गोंधळ आला, सभात्याग आला. मंत्र्याची अनुउपस्थिती आली. विरोधक आक्रमक पाहून सत्ताधारी काय करीत आहे असा प्रश्न जनसामान्यांना पडत आहे. त्यामुळे वेळीच सर्व सदस्यांनी विचार केला पाहिजे. अधिवेशन हे जनतेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी असते. सभागृहात सदस्य वाटेल तो प्रश्न विचारतात व त्याची सोडवणुक या सभागृहात होते. मंत्र्यांना जाहिर उत्तर द्यावी लागतात. सभागृहाचे कामकाज आता सभागृहाच्या गॅलीरीत बसून पाहाण्याबरोबर टिव्हीच्या माध्यमात घरबसल्या पाहाता येते. त्यामुळे कोण कार्यक्षम मंत्री व विरोधक आहे हे कळून येत आहे. सभागृहाचे कामकाज पाहिल्यानंतर ठराविकच आक्रमक होताना दिसून येतात. काही मंत्रीगण उपस्थित राहात नाहीत तेही दिसून येते. त्यामुळे काही निर्बंध व आचारसंहीता लागू करण्याची गरज निर्माण होते की काय असे वाटायाला लागले आहे. राज्यात अनेक प्रश्न आहेत. त्यात पेपर फुटी, खासदार फुटल्याच्या बातम्या. नसरापुरचा निकाल. आदि प्रश्नाकडे लक्ष दिले जात आहे. मुलभुत प्रश्नाला बदल मिळत आहे. ते योग्य नाही. पावुस बऱ्यापैकी होत असताना शेतकऱ्यांना बियाणे व खते मिळतात का या बाबत चर्चा होत नाही. बोगस बियाणे माथी मारले तर पुर्ण जीवन बरबाद होते. वर्षभर काय खावे हा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे वेळीच सरकारने काही बाबतीत लक्ष दिले पाहिजे. शेतकऱ्यांना तर मोठी आशा आहे. अशा स्थितीत प्रत्यक्षात मदतीची गरज आहे. अधिवेशनात कामकाज मोठ्या प्रमाणात चालण्यापेक्षा पक्षीय राजकारण सुरू आहे. एकनाथ शिंदे यांची जी धडपड सुरु आहे यावर सभागृहाबाहेर चर्चा सुरू आहे. तसे पाहिले तर सहा खासदार फोडणे तोंडचे माप नाही. एका दमात नवु पैकी सहा खासदार फोडल्याची चर्चा तर होणारच. तसे धाडसी काम एकनाथ शिंदे यांच्याकडून झाले आहे. त्यामुळे आजच्या परिस्थिती भाजपानंतर एकनाथ शिंदे यांची शिवसेना दोन नंबरवर आहे. अशा राजकिय घडामोडीत जनतेचे प्रश्न दुरावत आहेत. विरोधक आक्रमक दिसून येत असले तरी किती पदरात पडले याचे मुल्यमापन झाले पाहिजे. राज्यात अनेक प्रश्न आहेत. महागाई व बेकारीबाबत कोणी बोलत नाही. रस्ते, पाणी, वीज असे प्रश्न एका दिवसात निकाली काढली जावू शकत नाही. त्यावर वेळ खर्ची होताना दिसून येत आहे. आज महागाई वाढली आहे. शेतकऱ्यांच्या मालास भाव नाही. तो ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्यांना नाही. या बाबत विचारविनियम झाला पाहिजे. राज्यात महागाई बाबत कोणताही सदस्य आवाज उठवित नाही. किती बेकारी वाढली आहे. इंजिनियर झालेल्यांची संख्या मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. या बाबत विचार होत नाही. फोडाफोडी चालू राहणार आहे. विरोधकाची संख्या कमी होत आहे हे लोकशाहीच्या दृष्टिने योग्य वाटत नाही. सरकारवर अंकुश ठेवण्याचे काम विरोधकांचे असते. जेवढे महत्व सत्ताधाऱ्यास त्यापेक्षा अधिक विरोधकास लोकशाहीत समजले जाते. त्यामुळे विरोधकांची संख्याबळ कमी होत आहे हे योग्य नाही. विरोधक सुद्धा सुधारण्याचा विचार करीत नाहीत. उद्धव ठाकरे यांच्याकडून जहरी टीका होत आहे. जे घडले, जे झाले त्यावर चिंतन होत नाही. खासदार फुटले, सचिन अहिर सारखा मुंबईत वर्चस्व असणारा आमदार दुरावला गेला आहे. हे योग्य नाही. अजून काही आमदार दुर जाण्याच्या तयारीत आहेत. टायगर दोनची तयारी सुरु आहे असे म्हटले जात आहे. यात तथ्यही दिसून येते. सध्याला दुरदृष्टिचे नेते नाहीत. त्याग, कष्ठ, प्रामाणिपना, निष्ठा हे सर्व बाद झाले आहे. त्याच प्रमाणे बुडत्या जहाजामध्ये कोणी बसण्यात तयार नाहीत. 'जो देता वहीं नेता' हा धर्म पाळला जात आहे. जे काही विशेषनामे आहेत ते बाद झाले आहेत. अशा घडामोडीत जनतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत आहे. जनतेचे प्रश्न तसे मोठी नाहीत मात्र अधिक खर्चिक आहेत. मोठ्या निधीची गरज आहे. अशा स्थितीत आमदारच सभागृहात सत्ताधाऱ्यांकडून काही बाबी पदरात पाडून घेवू शकतो. सध्याला समाजकारण कमी व राजकारण अधिक दिसून येत आहे. चिंतन-मनन कमी होत आहे. का फुटले किंवा अजून फुटणार या बाबत चिंतन नाही. त्यांना रोखण्यासाठी प्रयत्न नाही. जनतेसोबत जाण्याचा कार्यक्रम नाही. जनता दुरावत आहे. यावर विचार होत नाही. सध्याला परिस्थितीच विचित्र होत आहे. धाराशिवचे खासदारांनी एक विचार व्यक्त केला. ते म्हणाले कितीही प्रामाणिक व जनतेशी घट्ट नाळ जुडलेला कार्यकर्ता, प्रचंड लोकप्रिय असणारा कार्यकर्ता पडतो कसा? असा कार्यकर्ता दोन किंवा तीन नंबरवर राहातो. त्यामुळे लोकप्रतिनिधी म्हणून काही निर्णय घ्यावे लागतात. वास्तविक त्यांचे विचार चुकीचे नाहीत. सत्तेपुढे शहाणपना चालत नाही. हे लक्षात घेवून राजकारण खेळावे लागते. ते खेळताना आपल्यामतदार संघाचा विकास करून घ्यावा लागतो. निधी खेचून आणावा लागतो. कामे प्रमाणिक कराविच लागतात. कामे झाली तरच कार्यकर्ते जवळ येतील. हा विचार योग्य आहे. विरोधकांचे कामे होत नाहीत, यामागे एक विरोधकांची ताकद कमी पडते. दुसरे अधिक शक्ती खर्च करावी लागते. यश येवो न यवो. त्यामुळे सध्याला जनतेच्या प्रश्नाला बगल दिली जात आहे. महागाई वाढत आहे. बाजारात व्यापारी काय दराने विक्री करीत आहेत. ते नियमाने आहे का हे पाहाण्यासाठी शासनाला वेळ नाही. शासनालाच वेळ नसेल तर त्यापेक्षा प्रशासन सुस्त आहे. त्याला महिण्याची पगारीशी मतलब आहे हे कोडे लक्षात घेतले पाहिजे. ओरडणारे ओरडत आहे. खाणारे खात आहेत. जे चालले आहे हे केवळ पाहाण्याची वेळ आली आहे. हे सर्वात मोठे दुर्दैव आहे. त्यामुळे विचार करायाला लावणारी लोकशाही दिसून येत आहे. लोकशाही कशाला म्हणायाचे जे अभ्यासक्रमात राज्यशास्त्र शिकलो मात्र प्रत्यक्षात वेगळेच दिसते?

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेमुळे मिळणार ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी




शेतकऱ्यांसाठी पीक कर्ज हे केवळ एक आर्थिक सहाय्य नसून, ते शेतीच्या संपूर्ण उत्पादन चक्राला गती देणारे एक महत्त्वाचे साधन आहे. मात्र, बदलत्या हवामानामुळे उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीसह इतरही कारणांमुळे अनेकदा शेतकरी कर्जबाजारीपणाच्या चक्रात अडकतात. एकदा पीक कर्ज थकीत झाले की, त्या शेतकऱ्यांची पतक्षमता कमी होते आणि पुढील हंगामासाठी नवीन कर्ज मिळण्यात अडचणी निर्माण होतात. त्यामुळे शेतीच्या अर्थकारणाची गती मंदावते. हीच बाब लक्षात घेऊन, राज्य शासनाने थकीत कर्जदार शेतकऱ्यांना पुन्हा बँकिंग व्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर केली आहे. हा निर्णय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू असलेल्या शेतकरी बांधवांना नवसंजीवनी देणारा ठरणार आहे.

पीक कर्ज थकीत झाल्यानंतर संबंधित कर्जखाते बँकिंग नियमांनुसार अनुत्पादित मालमत्ता (एनपीए) होण्याचा धोका वाढतो. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना बँकांकडून नव्याने कर्ज मिळणे शक्य न झाल्याने, त्यांना नाईलाजास्तव खासगी सावकारांच्या दारात उभे राहावे लागते. या पार्श्वभूमीवर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना ही केवळ एक कर्जमाफीची योजना नसून शेतकऱ्यांना बँकिंग व्यवस्थेशी पुन्हा जोडण्याचा एक महत्वपूर्ण दुवा आहे. कर्जमुक्तीनंतर पात्र शेतकऱ्यांची थकीत खाती नियमित होतील, ज्यामुळे त्यांना अत्यंत कमी व्याजदरात बँकांकडून नवीन पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होईल.

केवळ थकबाकीदारांनाच नव्हे, तर आर्थिक शिस्त पाळणाऱ्या शेतकऱ्यांनाही या योजनेत न्याय देण्यात आला आहे. नियमितपणे पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या प्रामाणिक शेतकऱ्यांना शासनाकडून ५० हजार रुपयांपर्यंत विशेष प्रोत्साहन पर लाभ दिला जाणार आहे.

शेतकरी आणि बँक यांच्यातील नाते हे केवळ कर्जदार आणि कर्जदाता एवढ्यापुरतेच मर्यादित नसून ते ग्रामीण विकासाचे मुख्य माध्यम आहे. या योजनेच्या माध्यमातून हे नाते अधिक दृढ होणार आहे. शेतकरी बांधवांनी नियमित कर्ज परतफेड केल्यास त्यांना भविष्यात केवळ पीक कर्जच नव्हे, तर शेतीचे यांत्रिकीकरण, आधुनिक सिंचन पद्धती आणि इतर महत्त्वाच्या कृषी योजनांचा लाभ अत्यंत सहजतेने घेता येईल. त्यामुळे कर्जमुक्ती म्हणजे सर्व आर्थिक समस्यांचा अंत नसून, ती एक नव्या आर्थिक नियोजनाची सुरुवात ठरणार आहे.

**संकलन :**
**जिल्हा माहिती कार्यालय, लातूर**

## सबळ शेतकरी, समृद्ध महाराष्ट्र !

विशेष लेख -३

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ ही महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात व्यापक, तांत्रिकदृष्ट्या प्रगत अशी योजना आहे. थकीत कर्जाचा डोंगर उपसल्यामुळे ५६ लाख शेतकरी पुन्हा एकदा बँकिंग प्रवाहाशी जोडले जातील, ज्यामुळे त्यांना नवीन तंत्रज्ञान आणि बी-बियाणांसाठी पतपुरवठा उपलब्ध होईल. संपूर्ण कर्जमुक्ती, एकवेळ समझोता आणि नियमित परतफेड करणाऱ्यास प्रोत्साहनपर लाभांबाबत आपण यापूर्वीच्या लेखात समजून घेतलं. आज आपण या योजनेसाठी अपात्रताधारक कोण असतील, याबाबतही चर्चा करू.

ही योजना केवळ एक कर्जमाफीची वा कर्जमुक्तीची घोषणा नाही, तर तंत्रज्ञानाची अचूक जोड देऊन राबवली जाणारी एक ऐतिहासिक मोहीम आहे. या पारदर्शक पद्धतीमुळे मध्यस्थांचा सुळसुळाट थांबेल आणि आर्थिक मदत थेट शेतकऱ्याच्या खात्यात जमा होईल. आता गरज आहे ती फक्त एकाच गोष्टीची-शेतकऱ्यांनी जागरूक राहून आपले डिजिटल प्रमाणीकरण वेळेवर पूर्ण करण्याची ! तरच या ऐतिहासिक योजनेचा खरा उद्देश सफल होण्यास मदत होईल.




कर्जाच्या ओझ्याखाली ५६ लाख शेतकऱ्यांना या योजनेमुळे पुन्हा एकदा आत्मविश्वासाने शेती करण्यासाठी बळ मिळणार आहे. २ लाखांची मुदत, जढड मधील लवचिकता आणि नियमित कर्जदारांना दिलेले प्रोत्साहन यांमुळे ही योजना मागील योजनांपेक्षा अधिक सर्वसमावेशक ठरणारी आहे.

पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळणारच. पण या योजनेतील अपात्रताधारक कोण आहेत, याचीही माहिती असणे आवश्यक आहे. या योजनेत राजकीय, सहकारी संस्थांचे पदाधिकारी, सरकारी कर्मचारी, सार्वजनिक उपक्रमातील कर्मचारी, शेतीव्यतिरिक्त उत्पन्नावर आयकर भरणारे व्यक्ती, निवृत्तीवेतनधारक अपात्र ठरविण्यात आले आहेत. सहकारी साखर कारखान्यांचे हंगामी कामगार मात्र, या योजनेसाठी पात्र असतील.

आजी- माजी मंत्री, खासदार, आमदार, जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, केंद्र व राज्य सरकारचे कर्मचारी, अधिकारी ज्यांचे मासिक वेतन २५,००० पेक्षा जास्त आहे. महावितरण, महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळ, राज्य परिवहन महामंडळ इ. मधील २५,००० पेक्षा जास्त वेतन असलेले कर्मचारी, शेतीव्यतिरिक्त उत्पन्नावर आयकर भरणाऱ्या व्यक्ती., ज्यांचे मासिक पेन्शन २५,००० पेक्षा जास्त आहे (माजी सैनिक वगळून)., कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी साखर कारखाने, सहकारी सूतगिरण्या, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., सहकारी दूध संघ या संस्थांचे पदाधिकारी (अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळ), अधिकारी व कर्मचारी ज्यांचे एकत्रित वेतन रूपये २५ हजार पेक्षा जास्त असणाऱ्या व्यक्ती योजनेसाठी अपात्र असतील.

केवळ शेतकऱ्यांना थकबाकी मुक्त करणे, हा या योजनेचा उद्देश नाही. शेतकऱ्याला पुन्हा आत्मविश्वासाने उभे करणे, ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देणे, हे मुख्य ध्येय आहे. 'सबळ शेतकरी, समृद्ध महाराष्ट्र' या मंत्राचा उच्चार करत, ही योजना राज्याच्या कृषी क्षेत्रासाठी खऱ्या अर्थाने एक मैलाचा दगड ठरेल यात शंका नाही.

**-डॉ. श्याम टरके,**
**सहायक संचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, लातूर**

# आभासातून आठवणीत...जिंदादिल महेश आफळे सर!

## काही माणसं जात नाहीत...ती आपल्या आठवणींमध्ये कायमची घर करून राहतात.

दुपारचे साधारण बारा वाजले असतील. ऑफिसमध्ये नेहमीप्रमाणे कामाच्या गडबडीत गुंतलो होतो. तेवढ्यात मोबाईल वाजला. स्क्रीनवर आमचे जिवलग मित्र श्री. गणेश (बाप्पा) पुराणिक यांचे नाव झळकले. फोन उचलला आणि त्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडले-

महेश आफळे सर गेले...

क्षणभर काळच थबकला.

मन सुन्न झालं. डोळ्यांसमोर अंधार दाटून आला. विश्वास बसत नव्हता. काही क्षण शब्दच हरवले. आणि मग आठवणींचा एक अखंड प्रवाह मनात वाहू लागला. जणू काळाने अचानक उलटी दिशा धरली होती...

महापारेषणमध्ये जनसंपर्क अधिकारी म्हणून कार्यरत असल्यामुळे महानिर्मिती आणि महावितरणमधील जनसंपर्क अधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क येत असतो. अनेक अधिकारी भेटले, अनेक सहकारी लाभले; पण काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, जी केवळ परिचयापुरती राहत नाहीत, तर आयुष्याच्या पानांवर कायमची कोरली जातात. महेश आफळे सर हे त्यापैकीच एक.



२०१९ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांदरम्यान मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्यासोबत सलग काम करण्याची संधी मिळाली. रोजचा सहवास लाभला आणि तेव्हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक सुंदर पैलू जवळून अनुभवायला मिळाले. फोनवरून होणारा परिचय आणि प्रत्यक्ष माणूस अनुभवणे यात किती मोठा फरक असतो, हे त्यांच्यामुळे जाणवलं.

आफळे सर म्हणजे शांततेचा, संयमाचा आणि प्रसन्नतेचा सुंदर संगम. त्यांच्या चेहऱ्यावरचं निरागस हास्य कधीच मावळताना पाहिलं नाही. कामाचा कितीही ताण असो, परिस्थिती कितीही गुंतागुंतीची असो, त्यांच्या चेहऱ्यावर नेहमी हसरे समाधान असायचे.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वात सुंदर पैलू म्हणजे त्यांचं संगीत आणि गायनप्रेम.

आभास किशोर या नावाने ते स्वरसम्राट किशोर कुमार यांच्या गीतांना जणू नवसंजीवनी द्यायचे. त्यांच्या आवाजात किशोरदांची गाणी ऐकताना आपण क्षणभर काळ विसरून जायचो. जनसंपर्क क्षेत्रातील अधिकारी म्हणून त्यांची ओळख होतीच; पण गायक म्हणून त्यांची वेगळीच दुनिया होती.

पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडिया आणि दैनिक फ्री प्रेस जर्नल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जनसंपर्क अधिकाऱ्यांच्या मैफिलीत त्यांनी गायलेली किशोरदांची गाणी आजही कानात घुमतात. त्या सुरांनी केवळ कार्यक्रम सजवला नव्हता, तर प्रत्येकाच्या मनात कायमची जागा निर्माण केली होती.

ते प्रिन्स या टोपणनावाने कविताही लिहायचे. शब्दांवर त्यांचं विलक्षण प्रेम होतं. कविता, संगीत, साहित्य, माणसं, अनुभव-सगळ्यावर त्यांचं सारखंच प्रेम होतं.

त्यांच्यासोबत श्री. अनिल कांबळेसाहेब, श्री. हेमंत पाटीलसाहेब, श्री. गणेश (बाप्पा) पुराणिकसाहेब आणि आम्ही सर्वजण एक टीम म्हणून अनेक जबाबदाऱ्या पार पाडत होतो. कामाच्या गडबडीतही जेवणानंतर त्यांना गाण्याची किंवा कवितेची फर्माईश करणे हा जणू आमचा अलिखित नियमच झाला होता. आणि तेही कधीही नकार न देता, मनापासून आमची इच्छा पूर्ण करायचे.

मंत्रालयातील बैठका असोत किंवा फोर्ट येथील एचएसबीसी कार्यालयातील महत्त्वाच्या चर्चा-महानिर्मिती, महापारेषण आणि महावितरणचे आम्ही सर्व जनसंपर्क अधिकारी एकत्र असायचो. वरिष्ठ अधिकारी कोणत्या विषयावर बोलतील, त्यांना कसे उत्तर द्यावे, कोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यावे, याबाबत मला आणि महानिर्मितीचे श्री. संतोष पुरोहित सरांना श्री. आफळे सर नेहमी मार्गदर्शन करायचे.

त्यांचा अनुभव हा केवळ कामापुरता मर्यादित नव्हता; तो माणसं ओळखण्याचा, नाती जपण्याचा आणि जीवन समजून घेण्याचा अनुभव होता.

ते अनेकदा हसत म्हणायचे,

मी लवकरच व्हीआरएस घेणार आहे...

आता संगीत, गायन आणि लेखनासाठी वेळ द्यायचा आहे.

आणि त्यांनी ते करूनही दाखवलं.

व्हीआरएसनंतर त्यांना भेटण्याचा योग आला. तासन्तास गप्पा झाल्या. त्यांच्या बोलण्यात आयुष्याबद्दलचा समाधानाचा सूर होता. प्रसिध्दीची हाव नव्हती; होती ती फक्त जगण्याची आणि इतरांना आनंद देण्याची ओढ.

नंतर नाशिकच्या सहलीत पुन्हा एकत्र येण्याचा योग आला. त्या प्रवासातील प्रत्येक क्षण आजही तितकाच ताजा आहे. त्यांच्या विनोदांनी, त्यांच्या गप्पांनी आणि त्यांच्या गाण्यांनी संपूर्ण प्रवास आनंदमय केला होता.

त्यांनी प्रेमाने आम्हाला त्यांच्या समर्थ निवास येथे नेले. इतक्या आत्मीयतेने पाहुणचार केला की, ते घर नव्हतं-ती माणुसकीची शाळाच होती. नाती कशी जपायची, माणसांवर मनापासून प्रेम कसं करायचं, हे त्यांनी कृतीतून शिकवलं.

महानिर्मितीच्या एकलहरे केंद्राला दिलेली भेटही आज स्मृतीत कोरली आहे. त्या प्रत्येक प्रवासात, प्रत्येक भेटीत त्यांनी मैत्री अधिक घट्ट केली.

व्हीआरएसनंतरही अधूनमधून आमचं बोलणं व्हायचंच.

आणि मग...

अचानक त्यांच्या निधनाची बातमी आली. मनाला खोलवर जखम करून गेली. काही माणसं आपल्यातून निघून जातात; पण त्यांचं हसू, त्यांचा आवाज, त्यांची गाणी, त्यांचे शब्द आणि त्यांनी दिलेला मायेचा स्पर्श आयुष्यभर आपल्यासोबत राहतो.

महेश आफळे सर हे अशाच दुर्मीळ माणसांपैकी एक.

आज ते आपल्या डोळ्यांसमोर नाहीत; पण त्यांच्या आठवणींच्या स्वरांनी मनात कायमची मैफल रंगलेली आहे.

मला खात्री आहे-

जिथे कुठे ते असतील, तिथेही ते किशोरदांचंच एखादं गाणं गुणगुणत असतील... एखादी कविता लिहित असतील...एखाद्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलवत असतील.

आज आभास किशोर शांत झाला आहे...

प्रिन्स शब्दांच्या पलीकडे निघून गेला आहे...

पण आमच्या मनात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आभास कायम राहणार आहे.

कारण काही माणसं कधीच मरत नाहीत...

ती आठवणींच्या रूपाने आयुष्यभर आपल्या श्वासांत जिवंत राहतात.

भावपूर्ण श्रध्दांजली, महेश आफळे सर!

आपल्या स्वरांची, आपल्या कवितांची आणि आपल्या माणुसकीची उब आम्हाला आयुष्यभर साथ देत राहील...

**- डॉ. मिलिंद आवताडे**
**जनसंपर्क अधिकारी, महापारेषण**

# महाराष्ट्र महाविद्यालयात सहकार चर्चासत्र संपन्न



**निलंगा/प्रतिनिधी:** येथील महाराष्ट्र महाविद्यालयात जिल्हा सहकार प्रशिक्षण केंद्र, सहकार जिल्हा उपनिबंधक कार्यालय व महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार मंत्रालय स्थापना दिवस व सहकार सप्ताहानिमित्त सहकार चर्चासत्र संपन्न झाले.

या कार्यक्रमात बोलताना जिल्हा सहकार प्रशिक्षण केंद्राचे उपप्राचार्य प्रा. एस. आर. कोळ्ळे यांनी सहकाराचा इतिहास व बदलत्या काळात सहकाराची वाढती उपयुक्तता यावर मार्गदर्शन केले. सहकारी साखर कारखाने, पतसंस्था व बँका या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. व त्या माध्यमातून शेतकरी, शेतमजूर, कामगार, ग्राहक व सर्वसामान्यांचा झालेल्या आर्थिक उत्कर्ष यावर त्यांनी प्रकाश टाकला. देशातील सहकार क्षेत्राला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन त्यात अधिक पारदर्शकता आणण्याच्या हेतूने सहकार मंत्रालयाची स्थापना झाली आहे असेही त्यांनी प्रतिपादन केले. याप्रसंगी डॉ. हंसराज भोसले यांनी अभ्यासपूर्ण मांडणी करताना पश्चिम महाराष्ट्रात सहकाराचे जाळे कसे वाढले व त्यातून शेतकऱ्यांचे आर्थिक कल्याण कसे निश्चित झाले यावर भाष्य केले, यासोबतच जुन्या काळातील दूरदृष्टीचे नेते बाळासाहेब विखे पाटील, डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर तसेच शरदचंद्रजी पवार यांच्या सहकार क्षेत्रातील योगदानावर त्यांनी प्रकाश टाकला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम हे होते. त्यांनी 'विना सहकार नाही उद्धार' या सहकाराच्या ब्रिदवाक्याचा विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात अंगीकार करावा व सहकारी तत्त्वाचा प्रचार प्रसार करण्यात मोलाची भूमिका वटवावी ही अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमासाठी लातूर जिल्हा सहकारी बोर्डाचे अध्यक्ष चर्चासत्राचे उदघाटक व्यंकटराव शिंदे, निलंगा तालुका सहकारी संस्थेच्या वरिष्ठ अधिकारी व्ही. डी. गंगणे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नरेश पिनमकर यांनी केले. तर आभार डॉ. विठ्ठल सांडूर यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संदीप सूर्यवंशी यांनी केले. कार्यक्रमासाठी वाणिज्य विभागाचे ५७ विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नामदेव गाडीवान, गणेश वाकळे, उमाजी तोरकड यांनी विशेष परिश्रम घेतले.

# लातूर तालुक्यात सर्वाधिक ११.४ मि.मी. नोंद,दमदार पावसाची अद्यापही प्रतीक्षा



**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यात गेल्या चोवीस तासांत रिमझिम आणि मध्यम स्वरूपाच्या पावसाने हजेरी लावली आहे. गुरुवार, २ जुलै २०२६ रोजी सकाळी आठ वाजेपर्यंत संपलेल्या चोवीस तासांत संपूर्ण जिल्ह्यात सरासरी ४.८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला असून, रखडलेल्या खरिपाच्या शेती कामांना आता गती मिळण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात सर्वत्र पावसाचे प्रमाण समान राहिलेले नाही. प्रशासनाने दिलेल्या तालुकानिहाय आकडेवारीनुसार, लातूर तालुक्यात सर्वाधिक ११.४ मिलीमीटर पाऊस झाला आहे. त्याखालोखाल रेणापूर तालुक्यात ७.० मि.मी. तर निलंगा तालुक्यात ५.५ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. याउलट देवणी तालुक्यात सर्वांत कमी, म्हणजे अवघा ०.२ मि.मी. पाऊस पडला आहे. तालुकानिहाय पावसात आढळतेय मोठी तफावत जिल्ह्यात पावसाचे प्रमाण सर्वदूर सारखे नाही. लातूर, रेणापूर आणि निलंगा तालुक्यांत बऱ्यापैकी पाऊस झाला असला तरी, इतर भागांत पावसाची केवळ रिपरिप आहे. औसा (४.८ मि.मी.), चाकूर (३.९ मि.मी.), जळकोट (३.५ मि.मी.) आणि उदगीर (२.२ मि.मी.) येथे मध्यम पाऊस झाला. तर शिरूर अनंतपाळ (१.६ मि.मी.), अहमदपूर (१.० मि.मी.) आणि देवणी (०.२ मि.मी.) तालुक्यांत पावसाचे प्रमाण अत्यंत नगण्य असल्याने येथील शेतकऱ्यांची चिंता कायम आहे.

# क्यूबेक सोबतच्या भागीदारीतून राज्यात मोठी गुंतवणूक होणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## कॅनडातील क्यूबेक प्रांतांच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्र्यांसमवेत भेट

**मुंबई/प्रतिनिधी:** महाराष्ट्र ही भारतामध्ये वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था आहे. देशात येणाऱ्या एकूण परकीय गुंतवणुकीपैकी ४० टक्के परकीय गुंतवणुक ही महाराष्ट्रात येते. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान, क्वांटम कम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, खाण संशोधन या क्षेत्रामध्ये गुंतवणुकीच्या मोठ्या संधी असून महाराष्ट्र क्युबेकसोबत या क्षेत्रासाठी भागीदारी करण्यास तयार आहे. या भागीदारीतून राज्यात निश्चितच मोठी गुंतवणूक येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

कॅनडातील क्युबेक प्रांताचे आंतरराष्ट्रीय व्यवहार मंत्री क्रिस्टोफर स्किट यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने विधानभवन येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी शिष्टमंडळासमवेत झालेल्या चर्चेदरम्यान मुख्यमंत्री बोलत होते. याप्रसंगी राज्य शिष्टाचार मंत्री जयकुमार रावल उपस्थित होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, २०१८ मध्ये मॉन्ट्रियल येथे भेट दिली असता, त्यावेळी माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, नवीनीकरणीय ऊर्जा, जैवतंत्रज्ञान तसेच आदिवासी कल्याण या विषयावर सामंजस्य करार करण्यात आले होते. हे करार महाराष्ट्र आणि क्यूबेकमधील संबंध अधिक दृढ असल्याचे प्रतीक आहे. तसेच नुकतेच कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्या नेतृत्वात आलेल्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाशी मुंबई भेटीदरम्यान महाराष्ट्रातील गुंतवणुकीच्या संधी विषयी सकारात्मक चर्चा झाली होती. नवी मुंबईमध्ये एज्युसिटी उभारण्यात येत असून या ठिकाणी सर्व आवश्यक पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यात येत आहे.या एज्युसिटीमध्ये क्यूबेकमधील विद्यापीठांनी आपली दालने उघडून 'मायनिंग इंजीनियरिंग' या विषयाशी संबंधित अभ्यासक्रम विशेषत्वाने सुरू करावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यामध्ये पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांसह वाढवण बंदर प्रकल्पावर काम सुरू आहे. राज्यामध्ये गुंतवणूक करून उद्योग उभारण्यासाठी सुलभ धोरण आहे. राज्यातील गुंतवणूक ही दीर्घकालीन अनुकूल परिणाम देणारी आहे. 'क्रिटिकल आणि स्ट्रॅटेजिक मिनरल्स' मध्ये गुंतवणुकीची क्यूबेकमधील गुंतवणूकदारांना मोठी संधी आहे.

एरोस्पेस, डिफेन्स या क्षेत्रातही राज्यामध्ये मोठे काम होत आहे. नागपूर परिसरात 'डिफेन्स कॉरिडोर' ची निर्मिती करण्यात येत आहे. त्यामुळे एरोस्पेस क्षेत्राची परिसंस्था वेगाने विस्तारित होत आहे. त्याचप्रमाणे जीसीसी, डेटा सेंटर, बॅटरी स्टोरेज, कृषी मधील नवीन तंत्रज्ञान या क्षेत्रातही महाराष्ट्र पुढे येत आहे. त्यामुळे क्यूबेकने महाराष्ट्रसोबत दीर्घकालीन भागीदारी करावी, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधोरेखित केले. क्युबेक प्रांताचे आंतरराष्ट्रीय व्यवहार मंत्री क्रिस्टोफर स्किट म्हणाले की, क्यूबेक कॅनडामध्ये प्रगत राज्य असून कृत्रिम बुद्धिमत्ता, डाटा सेंटर, शिक्षण, क्रिटिकल मिनरल्स यामध्ये मोठी गुंतवणूक आहे. क्युबेक महाराष्ट्रासोबत विविध क्षेत्रांमध्ये भागीदारी करण्यास तयार आहे. पेन्शन फंड संस्थेच्या माध्यमातून भारतामध्ये मोठी गुंतवणूक करण्यास क्युबेकने तयारी केली आहे. भागीदारीच्या माध्यमातून महाराष्ट्रात विविध क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करण्यात रस असल्याचेही स्किट यांनी सांगितले.

यावेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबळगन, राजशिष्टाचार विभागाचे सचिव राजेश गवांदे, कॅनडातील क्यूबेक प्रांताचे आंतरराष्ट्रीय व्यवहार सहाय्यक उपमंत्री डॉमिनिक मार्कोट्टे, सल्लागार श्रीमती लिया फर्टीन, संचालक मायकल कॉन्स्टेनिन, स्टीफन फलेक्कर, क्यूबेक प्रांतातील सीडीपीक्यू गुंतवणूक संस्थेचे भारतातील व्यवस्थापकीय संचालक नटराजन वेंकटरमण आदी उपस्थित होते.

# पावसाळ्यात विद्युत अपघात टाळण्यासाठी सतर्क रहा !

# खबरदारी हीच सुरक्षा; महावितरणचे नागरिकांना आवाहन

**धाराशिव/लातूर/प्रतिनिधी:** दि. ०३ जूलै २०२६ : पावसाळयात पाऊस व वादळी वाऱ्यामुळे महावितरणच्या वीजयंत्रणेला मोठा फटका बसत असतो. विजेच्या तारा तुटने, विजेचे खांब कोसळणे, रोहित्र कोसळणे त्याचबरोबर करंट उतरणे अशा घटना घडत असतात. अशावेळी काही प्रसंगी दुर्घटनाही घडतात. त्यामुळे पावसाळ्यात होणार संभाव्य विद्युत अपघात टाळण्यासाठी सुरक्षि-ततेचे सर्व नियम पाळण्याचे व खबरदारी घेण्याचे आवाहन महावितरणने नागरिकांना केले आहे.




मुसळधार पाऊस व जोरदार वाऱ्यामुळे तुटलेल्या फांद्या वीज वाहीनीच्या तारांवर अडकून पडल्या असल्यास त्या स्वतः काढण्याचा प्रयत्न करू नये. तसेच झाडे पडल्याने वीजखांब वाकला वा मोडला जातो. परिणामी वीजतारा तुटण्याचे प्रकार घडतात. त्यात वीजप्रवाह असण्याची शक्यता असल्याने अशा तुटलेल्या, लोंबकळणाऱ्या वीजतारांपासून सावध राहावे. या तारांना हात लावण्याचा किंवा हटवण्याचा प्रयत्न करू नये आणि त्वरित महावितरणशी संपर्क साधावा. घरात बसवलेल्या मीटरवर पाणी पडत असल्यास किंवा मीटर असलेली भिंत ओली असल्यास त्वरित महावितरणशी संपर्क साधावा. विजेच्या पोलला हात लावू नये. खांबाच्या स्टेवायरला गुरे-ढोरे बांधू नयेत तसेच कपडे वाळत घालण्यासाठी स्टेवायरचा वापर करू नये. घरामध्ये असलेली विद्युत यंत्रणा व घराजवळ असलेली अर्थिंग मान्यताप्राप्त कंत्राटदाराकडून तपासून घ्यावी. अपार्टमेंटच्या मीटर बॉक्सची स्वच्छता राखावी भिंतीमध्ये पाणी मुरणार नाही याची काळजी घ्यावी. स्वीच बोर्डापासून मोटारीपर्यंत जाणाऱ्या वायरला जोड देऊ नये. घरात शॉर्टसर्किट झाल्यास मेन स्वीच तत्काळ बंद करावा. घरावरील दूरचित्रवाणीची डिश किंवा अँटेना वीज तारांपासून दूर ठेवावा. ओल्या कपड्यांवर विजेची इस्त्री फिरवू नये. विजेचे स्वीच बोर्ड किंवा कोणत्याही उपकरणाला पाणी लागणार नाही याची दक्षता घ्यावी. विशेषतः टिन पत्र्याच्या घरात राहणाऱ्या नागरिकांनी पावसाळ्यात अतिदक्ष राहून विजेपासून सुरक्षित राहण्यासाठी उपाययोजना कराव्यात. अशा प्रसंगी खबरदारीचा उपाय म्हणून रोहित्र आणि फिडर बंद करण्यात येतो. त्यामुळे वीजपुरवठा काही कालावधीसाठी बंद होतो. अशा स्थितीत संभाव्य धोका टाळण्यासाठी नागरिकांनी महावितरणला सहकार्य करावे.

**येथे करा संपर्क**

**शहरी व ग्रामीण भागातील वीजग्राहकांना खंडित वीजपुरवठ्याची माहिती देण्यासाठी वा तक्रारीसाठी २४ तास सुरु असणाऱ्या कॉल सेंटरवर संपर्क करता येईल. टोलफ्री क्रमांकाद्वारे केलेल्या सर्व तक्रारी सीआरएम सॉफ्टवेअरमध्ये नोंदविल्या जातात आणि निपटारा करण्यासाठी एसएमएस पाठवून संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्याला देण्यात येतात. यासाठी ग्राहकांनी १९१२,१८००२१२३४३५, किवा १८००२३३३४३५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, तसेच धाराळिव जिल्हयाच्या ७८७५२११६१५ या सनियंत्रण कक्षाच्या मोबाईल क्रमांकावरती संपर्क साधावा सदरील क्रमांकावरती व्हॉटसप सेवाही कार्यरत असल्याने टेक्स्ट मेसेजसह तक्रारींशी निगडीत फोटोही वीजग्राहकांना शेअर करता येणार आहेत.**

# रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना पहिल्याच बैठकीत आकराशे अर्जांना मंजूरी

**लातूर/प्रतिनिधी:** रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीची बैठक लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या सूचनेनुसार २ जुलै रोजी घेण्यात आली असून समितीचे अध्यक्ष सतीश आंबेकर यांच्या अध्यक्षतेत झालेल्या पहिल्याच बैठकीत तब्बल ११४६ अर्जांना मान्यता देण्यात आली आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती १३ मे २०२६ रोजीच्या पत्रानुसार सतीश आंबेकर यांच्या अध्यक्षतेत गठीत करण्यात आली आहे. दीड महिन्यापूर्वी गठीत झालेल्या या समितीस तातडीने बैठक घेऊन गोरगरीब, सर्वसामान्य गरजू लाभधारकांना, निराधारासह विधवा, अपंगांना लाभ द्यावा अशी सूचना आ. रमेशआप्पा कराड यांनी केली होती. सदरील सूचनेनुसार २ जुलै रोजी रेणापूर तहसील कार्यालयात समिती अध्यक्ष सतीश आंबेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत १३८४ अर्ज ठेवण्यात आले होते त्यापैकी ११४६ अर्जांना मंजुरी देण्यात आली तर उर्वरित त्रुटी असल्याने २३८ अर्ज नामंजूर करण्यात आले. प्रारंभी समिती सचिव तथा तहसीलदार प्रशांत थोरात यांनी समिती अध्यक्षासह सर्व सदस्यांचा सत्कार करून स्वागत केले. तर समितीच्या वतीने सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्याचा सत्कार केला.




रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीच्या बैठकीस समितीचे अध्यक्ष सतीष रावसाहेब आंबेकर, सचिव तथा तहसीलदार प्रशांत थोरात, सहा. गोविंद काळे, समिती सदस्य ललीता कांबळे, कस्तुराबाई माने, विठ्ठल कसपटे, संजय चव्हाण, गोविंदराव देशमुख, सदानंद पिंपळे, विरेन्द्रसिंह चौहान, सतिश जाधव, सुरेश बुड्डे यांच्यासह महसूल सहाय्यक गुलाब काळे, तुकाराम जाधव माहिती तंत्रज्ञान सहाय्यक विठ्ठल राठोडे आदी होते.

# स्टँड अप इंडिया मार्जिन मनी योजना अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील नवउद्योजकांनी

## ३१ जुलै पूर्वी अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी:** केंद्र शासनाच्या 'स्टँड अप इंडिया' योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील घटकांसाठी 'मार्जिन मनी योजना' सुरू करण्यात आली आहे. या योजनेसाठी लातूर जिल्ह्यातील इच्छूक नवउद्योजक लाभार्थ्यांनी आपले प्रस्ताव ३१ जुलै २०२६ पूर्वी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, लातूर यांच्याकडे सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

या योजनेच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना ९ मार्च २०२० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे निश्चित करण्यात आल्या असून, हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर नागरिकांच्या निरीक्षणासाठी उपलब्ध आहे. या योजनेचा लाभ घेण्यास इच्छूक असणाऱ्या नवउद्योजकांनी या शासन निर्णयातील नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता करून, आपले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह विहित मुदतीत समाज कल्याण कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे. अंतिम मुदतीनंतर येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नसल्याने पात्र लाभार्थ्यांनी तात्काळ आपले प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# सी.आय.एस.एफ. मध्ये 'पॅरा मेडिकल स्टाफ'ची भरती; लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी:** केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलामध्ये 'पॅरा मेडिकल स्टाफ' या तात्पुरत्या पदांच्या भरतीसाठी पात्र पुरुष आणि महिला भारतीय नागरिकांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. या भरती प्रक्रियेत ए.एस.आय. (औषध विक्रेता) ची १८ पदे, ए.एस.आय. (एक्स-रे टेक्निशियन) चे १ पद आणि ए.एस.आय. (लॅब टेक्निशियन) च्या ५ पदांसह एकूण २४ रिक्त जागा भरल्या जाणार आहेत. या एकूण २४ पदांपैकी खुल्या प्रवर्गासाठी १५, ई.डब्लू. एस. साठी १, ओ.बी.सी. साठी ५, एस.सी. साठी २ आणि एस.टी. प्रवर्गासाठी १ पद राखीव असून, औषध विक्रेता पदांमध्ये २ जागा माजी सैनिकांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

ही भरती सर्व पुरुष व महिला उमेदवारांसाठी खुली असून पात्र उमेदवारांना केवळ एकाच पदासाठी अर्ज करता येईल. लातूर जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक आणि माजी सैनिक विधवांच्या पाल्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज ७ जुलै २०२६ रोजी रात्री २३:५९ वाजेपर्यंत सी.आय.एस.एफ. च्या https://cisfrectt.cisf.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे, कारण ऑनलाईन पद्धतीशिवाय इतर कोणत्याही माध्यमातून आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# नुतन मनपा आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी कचरा डेपोवर व मनपा शाळेलाही दिली भेट





**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिकेचे नूतन आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी शुक्रवारी ( दि. ३) वरवंटी येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास भेट देऊन पाहणी केली.मनपा शाळेलाही त्यांनी भेट दिली.

राहुल कुलकर्णी यांनी गुरुवारी लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला आहे. दुसऱ्याच दिवशी त्यांनी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास भेट देऊन माहिती घेतली. ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून तयार केलेले कंपोस्ट खत तसेच सुका कचरा प्रकल्प, बायोगॅस प्रकल्प व जुन्या साठलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या प्रकल्पांचीही त्यांनी माहिती घेतली.

यावेळी कचरा व्यवस्थापन व प्रक्रिया करण्यासाठी पूर्णपणे विलगीकृत कचरा येणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. या प्रक्रियेत काम करत असताना कर्मचाऱ्यांनी पूर्णपणे किटचा वापर करावा, असा आदेशही त्यांनी दिला.

याप्रसंगी मनपा उपायुक्त वसुधा फड,कनिष्ठ अभियंता गणेश देवणीकर, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प प्रमुख धोंडीबा सोनवणे यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

आयुक्तांनी शहरात मनपाच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या सावित्रीबाई फुले मनपा शाळा क्र.९ ला भेटी दिली.तेथील शिक्षक व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मनपा शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजना संदर्भात त्यांनी चर्चा केली.

आयुक्तांनी पदभार स्वीकारल्यानंतर लागलीच विविध ठिकाणी भेटी देऊन कामकाजाची माहिती घेत आहेत.

# श्रीमती वैजयंती निलेगांवकर यांचे यांचे निधन



**लातूर/प्रतिनिधी :** श्रीमती वैजयंती देविदासराव निलेगांवकर यांचे दि. ३ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास वृध्दपकाळाने वयाच्या ८४ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवदेहावर दि. ४ जुलै रोजी सकाळी १० वाजता मारवाडी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. निलेगावकर परिवाराच्या दु:खाद जडे परिवार सहभागी आहे. आत्म्यास परमपिता परमेश्वर चिरशांती देवो. निलेगावकर परिवारास हे दु:ख सहन करण्याची परमपिता परमेश्वर शक्ती देवो!

## केशवराज शैक्षणिक संकुलातील गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य गुणगौरव सोहळा

# विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांच्या यशाला सलाम

**लातूर/प्रतिनिधी : अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री केशवराज शैक्षणिक संकुलात रविवार दि. ५ जुलै २०२६ रोजी,१० वी, १२ वी गुणवंत विद्यार्थी, छचचड परीक्षा, क्रीडा, कला क्षेत्र अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करून संस्थेचा नावलौकिक उंचावणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा भव्य गुणगौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न होणार आहे.**

विद्यार्थ्यांच्या कष्ट,जिद्द, चिकाटी आणि पालकांच्या त्यागाला मानाचा मुजरा करणारा हा सोहळा केवळ सत्काराचा कार्यक्रम नसून, नव्या पिढीच्या स्वप्नांना प्रेरणा देणारा आणि गुणवत्तेच्या परंपरेला नवी दिशा देणारा प्रेरणोत्सव ठरणार आहे.या भव्य कार्यक्रमाचे आयोजन तीन स्वतंत्र सत्रांत करण्यात आले असून प्रत्येक सत्रात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा पालकांसमवेत गौरव करण्यात येणार आहे.

सकाळी शाळा परिसरात होणाऱ्या पहिल्या सत्रात छचचड शिष्यवृत्ती परीक्षा, तसेच राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार होईल. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री केशवराज शैक्षणिक संकुल स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून उद्धव फड यांची उपस्थिती लाभणार आहे.

यानंतर सकाळी ११.०० वाजता दयानंद सभागृह, लातूर येथे दुसरे सत्र संपन्न होईल. या सत्रात इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थी व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेत्ररोग तज्ज्ञ तथा भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे ज्येष्ठ सभासद डॉ. राम पाटील (अंबाजोगाई) राहतील. प्रमुख मार्गदर्शक म्हणून लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य जितेश चापसी तसेच लातूर जिल्हा परिषदेतील गटनेते रामचंद्र तिरुके यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

सायंकाळी ५.०० वाजता दयानंद सभागृहात होणाऱ्या तिसऱ्या आणि मुख्य सत्रात दहावी बोर्ड परीक्षेत ९५ ते १०० टक्के गुण प्राप्त विद्यार्थी, बारावी बोर्ड परीक्षा, उएढ परीक्षा तसेच राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. या सत्राच्या अध्यक्षस्थानी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख राहतील. प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील हे उपस्थित राहणार आहेत. तसेच संभाजीनगरचे प्रसिद्ध उद्योजक विवेक देशपांडे,लातूर जिल्ह्याच्या अप्पर जिल्हाधिकारी तथा केशवराज विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी श्रीमती शिल्पाताई करमरकर, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव आणि केंद्रीय विद्यासभेचे संयोजक महेश कस्तुरे यांचीही प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेने गेल्या अनेक दशकांपासून गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कार, शिस्त आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाची समृद्ध परंपरा जपली आहे. या परंपरेतून घडलेले विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करीत असून, त्यांच्याच गौरवासाठी आयोजित करण्यात आलेला हा सोहळा विद्यार्थ्यांच्या यशाला समाजाचा सन्मान देणारा आणि भावी पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

या त्रिसत्रीय गुणगौरव सोहळ्यास लातूर शहर व जिल्ह्यातील शिक्षणप्रेमी नागरिक, पालक, माजी विद्यार्थी व हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या यशाचा आनंद सामायिक करावा आणि भारतीय शिक्षण प्रसारक संस्था तसेच श्री केशवराज शैक्षणिक संकुलावरील आपला स्नेह अधिक दृढ करावा, असे आवाहन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख,जितेश चापसी, संजय गुरव, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, शालेय समिती अध्यक्ष (माध्यमिक विभाग) गंगाधर खेडकर, शालेय समिती अध्यक्ष (रेनिसन्स सीबीएसई स्कूल) प्रा.श्रीकृष्ण जाधव, शालेय समिती अध्यक्षा (केशव शिशु वाटिका) सौ.वर्षाताई डोईफोडे,मुख्याध्यापक (माध्यमिक) शैलेंद्र कंगळे, उपमुख्याध्यापक तथा विद्यासभा संयोजक महेश कस्तुरे,प्राचार्या (रेनिसन्स सीबीएसई स्कूल) श्रीमती सोनाली दर्डा, मुख्याध्यापक (प्राथमिक) शिवाजी हेंडगे,शिशु वाटिका प्रधानाचार्या सौ.अवंती कुलकर्णी, समन्वयक गुरूनाथ झुंजारे यांनी केले आहे.

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ६१(११)] मंगळवार, एप्रिल २८, २०२६/वैशाख ८, शके १९४८ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २०१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ एप्रिल, २०२६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम.**

क्रमांक खाक्षेस-२०२५/प्र.क्र.५५३/भाग-६/लातूर/रस्ते-८.- ज्याअर्थी, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १५ च्या पोट-कलम (२) तसेच कलम १५ च्या पोट-कलम (३) व कलम १७ द्वारे प्रदान केलेले अधिकार व याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.खाक्षेस-२०२४/प्र.क्र.११८/रस्ते-८, दिनांक ७ मार्च २०२४ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा केला आहे) याद्वारे, पवनार ते पत्रादेवी (नागपूर-गोवा) महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग (राज्य महामार्ग (विशेष) क्र.१०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त महामार्ग" असा केला आहे) याच्या सार्वजनिक प्रयोजनासाठी जसे की, बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे जमीन संपादित करण्याचा आपला उद्देश घोषित केलेला आहे; आणि **महाराष्ट्र शासकीय राजपत्रात** उक्त अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी लातूर, जिल्हा लातूर यांच्याकडे, ज्यांच्या जमिनी उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये समाविष्ट केल्या आहेत अशा उक्त जमिनीत हितसंबंध असलेल्या व्यक्तीकडून हरकती मागविलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट-कलम (३) च्या दुसऱ्या आणि तिसऱ्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.खाक्षेस-२०२४/प्र.क्र.११८/रस्ते-८, दिनांक २४ सप्टेंबर, २०२५ द्वारे, आवश्यकतेनुसार उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट-कलम (३) द्वारे घोषणापत्र प्रसिध्द करणेसाठीच्या कालावधीस उक्त अधिसूचने अन्वये २८ एप्रिल, २०२६ पर्यंत मुदतवाढ प्रदान केली आहे;

आणि ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी लातूर, जिल्हा लातूर यांनी, उक्त जमिनीत हितसंबंध असलेल्या व्यक्तींकडून प्राप्त झालेल्या हरकती विचारात घेतल्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्याचा अहवाल राज्य शासनास सादर केलेला आहे;

(१)

भाग चार-ब-२०१-१

२ महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, एप्रिल २८, २०२६/वैशाख ८, शके १९४८

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, उक्त अहवाल विचारात घेतल्यानंतर, या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली जमीन, उक्त महामार्गाचे बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी संपादित करण्याचे ठरविलेले आहे;

त्याअर्थी आता, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) याच्या कलम १८ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान केलेले अधिकार व याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गावांच्या बाबतीत त्यातील स्तंभ (३) मध्ये नमूद केलेला जमीन धारण सर्वे क्रमांक किंवा गट क्रमांक, अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र उक्त महामार्गाचे बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी संपादित करण्यात येईल असे घोषित करीत आहे.

अनुसूची

जमिनीचे विवरण

तालुका : लातूर जिल्हा : लातूर

| अनु. क्र. | गाव | सर्वे क्र. / गट क्र. | क्षेत्र (हेक्टर आर) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | दिंडेगाव | १५१ पैकी | २.२१०० |
| २ | दिंडेगाव | १४६ पैकी | ०.७०५० |
| ३ | दिंडेगाव | १५० पैकी | ०.३८६५ |
| ४ | दिंडेगाव | १४९ पैकी | ०.३७१० |
| ५ | दिंडेगाव | १४८ पैकी | ०.३६०२ |
| ६ | दिंडेगाव | १४७ पैकी | ०.३९६० |
| ७ | दिंडेगाव | १४५ पैकी | ०.८७३० |
| ८ | दिंडेगाव | १४० पैकी | ०.७९७० |
| ९ | दिंडेगाव | १३६ पैकी | ०.५२६० |
| १० | दिंडेगाव | १३९ पैकी | ०.३८७० |
| ११ | दिंडेगाव | १३७ पैकी | ०.३६०० |
| १२ | दिंडेगाव | १३४ पैकी | ०.१४०० |
| १३ | दिंडेगाव | १३५ पैकी | १.४७८० |
| १४ | दिंडेगाव | १३३ पैकी | १.७३१८ |
| १५ | दिंडेगाव | १३१ पैकी | ०.१५०० |
| १६ | दिंडेगाव | १३० पैकी | ०.०२३० |
| १७ | भोयरा | २१८ पैकी | ३.६४०४ |
| १८ | भोयरा | २१७ पैकी | ०.०००० |
| १९ | भोयरा | २१६ पैकी | १.०८०५ |
| २० | भोयरा | २१५ पैकी | १.१४०७ |
| २१ | भोयरा | २१४ पैकी | ०.७९३६ |
| २२ | भोयरा | २१३ पैकी | ०.६७०७ |
| २३ | भोयरा | २१२ पैकी | ०.००१३ |
| २४ | चिंचोली ब. | २८२ पैकी | ०.६९६५ |
| २५ | चिंचोली ब. | २८३ पैकी | २.८६५६ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संदीप खलाटे,**
शासनाचे उप सचिव.

**जिमाका/लातूर/जाहि.०६/२०२६–२७**

## खरबुज..

निर्णय घेत असताना
खूपदा होई कन्फ्युज
दिवेलागण होतानाचं
अचानकचं उडे फ्युज
मिडियाकाय तयारचं
लगोलग ब्रेकिंगन्यूज
लहानशी असून चूक
दाखवताप्रमाद ह्युज
अफवातयार नांदाया
सुरू सतत कुजबुज
लहान फोड ठुस ठुसे
केवढी आणली सूज
प्रतिपक्षांमध्ये त्वरित
रंगाया लागे हितगुज
चॅनलवाले दिवसभर
वाजवतबसे अलगूज
सामान्यांसकरमणूक
कटकटीत जरा मौज
स्वपक्षीय रणांगणात
घेऊनि उतरती फौज
कुणाचे काही असूद्या
आम्ही चाखे खरबूज
खाजवणारेखाजवती
अस्वस्थ करी खरूज
एवढ्याशा गोष्टी मुळे
कोसळत नाही बुरुज
पर्याय नसे बातमीला
वस्तुस्थिती करा चुज

**हेमंत मुसरीफ पुणे**
९७३०३०६९९६

# ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पाचे २ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत तर ३३ विद्यार्थ्यांना




**लातूर/प्रतिनिधी :** शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर झाला .यात ज्ञानप्रकाशच्या ३३ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळवली आहे .

इयत्ता ५ वी तून अर्णव बस्तापुरे व उत्कर्ष शेळके हे दोन विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत १३ व्या क्रमांकावर आहेत .

इयत्ता पाचवीतून १४ विद्यार्थी तर ८ वीतून १९ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत.

वर्षभर नियमित अभ्यास, वाढीव तास, सराव परीक्षा, गटकार्य, शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे प्रोत्साहन आणि विद्यार्थ्यांचे परिश्रम यामुळेच दरवर्षीप्रमाणे यावर्षीही ज्ञानप्रकाशचा निकाल लक्षवेधी लागला आहे.

इयत्ता ५ वी तून उत्कर्ष शेळके(२७४), अर्णव बस्तापुरे(२७४), अमेय आंबेकर(२५२), साक्ष जनवाडे(२४४), आदित्य गुणाले(२४४), अनिरुद्ध हुमनाबादे(२४२), सिद्धी माळवदकर(२३४), आदिती पाटील(२३२), पार्थ इंजे(२३२), संस्कृती सगर(२१६), हर्षदा बद्दे(२१२), प्रियांश बरगले(२१२), इकरा शेख(२१२), दत्तात्रय पुजारी(२०२); तर इयत्ता ८ वी तून सृष्टी अष्टेकर(२५८), उर्वी बिराजदार(२५०), नंदिनी कुलकर्णी (२४६),रजत कुलकर्णी(२४६), अन्वी कोपले(२४४), आदिती शिंदे(२४४), गौरी दुडीले(२४०), अवनी खानापुरे(२३६), रोहन मामडगे(२२६), अमन सय्यद(२२४), गणेश क्षीरसागर(२२२), अनुराग माने(२२०), श्रीपाद धायगुडे(२२०), सोहम गणापुरे(२२८), साशा वावरे(२१४), तनया देशमुख(२१४) सृष्टी खरोसे(२१४), पार्थ लोमटे(२१२), आरुष सपाटे(२१२) . या विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत येऊन शिष्यवृत्ती मिळवली आहे.

यावर्षी एकूण चार वर्गांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा झाली यात इ ५ वी आणि ८ वी ची गुणवत्ता यादी जाहीर झाली आहे . तर इ ४ थी आणि ७ वी वर्गाची गुणवत्ता यादी जाहीर होणे बाकी आहे . त्यातही उत्कृष्ट निकाल मुले देतील असे यावेळी प्रकल्प प्रमुख सतीश नरहरे यांनी सांगितले . तसेच मुलांचे आणि पालकांचे अभिनंदन केले . यावेळी संचालिका व मुख्याध्यापिका सविता नरहरे, उपमुख्याध्यापक शिवशंकर राऊत, पर्यवेक्षक अशोक गुरदाळे, प्रशांत शिंदे, मार्गदर्शक संपदा पांडे, मोहिनी बिराजदार,पल्लवी व्यवहारे, मंजुषा बिराजदार, शीतल येरटे, संजय सुर्यवंशी यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६